**डॉ. मोहन नामदेव आमृळे**
**संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण**
**ईमेल**– id-sports.mudept@gmail.com
**वेबसाईट**–www.mu.ac.in/sports

**मुंबई विद्यापीठ**

**विद्यापीठ क्रीडा संकुल**
मरीन लाईन्स, मुंबई – ४०० ०२०.
दूरध्वनी : २२८१ ७६९८/२२८२ ६०२७

क्र**तात्काळ/अती महत्त्वाचे**/ 03 /2023
दि. 17/4/23.

प्रति,

प्राचार्य / संचालक / विभाग प्रमुख,
मुंबई विद्यापीठ संलग्नित महाविद्यालये व संस्था.

विषय :- जिमखाना शुल्क/कीडा निधी जमाखर्च/उपयोगिता प्रमाणपत्र व कार्याचा वार्षीक अहवाल सादर करणेबाबत.

महोदय / महोदया ,

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार आपणांस कळविण्यात येते की, विद्यापीठ परिपत्रक क.कीडा समिती/७२ दि.२० नोव्हेंबर, २०१८ नुसार जिमखाना शुल्क रूपये ४००/- च्या १५% कीडा निधी रूपये ६०/- प्रति विद्यार्थी विद्यापीठाकडे जमा करणे व सदर परिपत्रकाच्या शिफारसीनुसार कार्यवाही करणे अपेक्षित आहे. (सदरचे परिपत्रक सोबत जोडले आहे) तसेच सन २०२२-२३ पर्यंतचे वार्षिक कीडा अंशदान थकीत (Outstanding Annual Sports Contribution) असल्यास **दिनांक ३१ मे, २०२३** पुर्वी वित्त व लेखा अधिकारी, मुंबई विद्यापीठ (Finance & Accounts Officer, University of Mumbai) यांच्या नावे **धनाकर्षाद्वारे (By Demand Draft)** संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण, मुंबई विद्यापीठ कीडा संकुल, मरीन लाईन्स, मुंबई- ४०० ०२० येथे जमा करण्यात यावे ही विनंती.

***त्याचप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून मुंबई विद्यापीठ आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धा चार विभागात सुरू झाल्यामुळे सन २०२१-२२ पासून प्रवेश शुल्क (Consolidated Entry Fee) स्विकारण्यात येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी ही विनंती.***

आपणांस विनंती करण्यात येते की, सन २०२२-२३ मध्ये आपल्या महाविद्यालयाने जमा केलेला जिमखाना शुल्क (Gymkhana Fees) निधीचा जमाखर्च/उपयोगिता प्रमाणपत्र व कार्याचा वार्षिक अहवाल (Income & Expenditure / Utilization Certificate & Annual Report) तसेच वार्षिक कीडा अंशदान (Annual Sports Contribution) सन २०२२-२३ पर्यंत विद्यापीठात जमा केले असल्यास त्याची सुध्दा माहिती विद्यापीठाच्या sports.mudept@gmail.com या ई-मेल वर दि.३१ मे, २०२३ पुर्वी सादर करण्यात यावी ही विनंती.

धन्यवाद !

संचालक,
क्रीडा व शारीरिक शिक्षण